नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३



**<u>साक्षीदार क्र.०१ सचिन गोवर्धन आठवले यांचा उलटतपास आरोपी क्र. ४ ते ६ तर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

**१०.** मयत वाघाचे नाव नव्हते. वाघ मयत झाल्याच्या ८ तासानंतर मी घटनास्थळी पोहचलो. मयत वाघची लाश २४ तासांनंतर सडण्यास सुरूवात होते. वाघाच्या मिशा व सुळे दात नसल्याबाबत पंचनामा हा कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाघाच्या मिशा व सुळे दात नसल्याबाबतचा क्लोजअप फोटो दाखल केला नाही. मयत वाघाजवळ पडलेले लाकूड ९० से.मी. चे होते. घटनास्थळाच्या पश्चिम दिशेला सदरचे लाकूड पडले होते. ते मयत वाघापासून किती अंतरावर पडले होते हे मला सांगता येणार नाही. मयत वाघापासून शेकोटी किती अंतरावर होती हे मी सांगू शकतो. शेकोटी १५० मिटरच्या अंतरावर होती. ४० ते ५० खुंटया होत्या. सेंट्रींग तार मयत वाघाच्या पूर्व दिशेला होत्या. खुंटया हया सागवन व बांबू लाकडाच्या होत्या. गॅल्वोनाईज तार ९० से.मी.चे होते. वन रक्षक शेलार यांना मुद्देमाल सुपुर्त केला. मी १ नंबरच्या टीमला होतो. हे म्हणणे खरे आहे की, लोखंडी आकोडे गॅल्वोनाईज तारला नव्हते. आकोडे हे गॅल्वोनाईज तारचे होते. वाघाचे रक्ताचे नमूने घेतले होते. त्याच्या फॉरेंसिक अहवाल प्रलंबित आहे. श्वान पथकाचा वेगळा पंचनामा तयार केला नाही. बांबूची काठी ५ ते ६ मिटरची होती. हे म्हणणे खरे नाही की, शवविच्छेदनचा पंचनामा झाला त्यावेळी मी तेथे नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, वाघ व डुक्कर यांची मिळून चार्जशिट फाईल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, डुक्कराच्या मासाचा सुरावा लागल्याने आरोपींना अटक केली. सोनपूर व सिरोंजी यामध्ये १ किलोमिटरचे अंतर आहे. वाघ मयत झाल्यापासून ते डुक्करचे मास मिळाल्यापासून त्यामध्ये २ दिवसांचे अंतर आहे.

**११.** घटनास्थळाच्या जवळच्या शेताचा ७/१२ उतारा लावला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरून मुद्देमाल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ३ तारेचे बंडल, सागवन लाकडाच्या खुंटया, जर्मनचे घमेले, सुरी व कु-हाड हे आरोपीच्या घरातून जप्त केले. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सागवन लाकडाच्या खुंटया, जर्मन घमेले व ३ तारांचे बंडल हे गजानन पाटील, रा. सोनपूर यांच्या शेतामधून आरोपीच्या समक्ष जप्त करण्यात आले आहे. कु-हाड व सुरी आरोपीच्या घरातून जप्त केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, डुक्कराचे मास जप्त झाले नाही.

नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३

**आरोपी क्र. ४ ते ६ तर्फे वकीलांच्या तोंडी विनंती वरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

SONPARI MAHENDRA GADE

Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.11.12 17:06:10 +0530

सावनेर,
दिनांक १२.११.२०२५

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe